**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेस शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. मान्यता-२०१२/(१५१/२०१२)/तांशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० जुलै, २०१२.

संदर्भ : मा. उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ६६००/२०१२ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश.

**प्रस्तावना** : रिट याचिका क्र. ८८४७/२००७ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर प्राप्त झालेले कायदेविषयक अभिप्राय, इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०१२ पर्यंत मान्यता दिलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात आले व त्यानुसारच शासनाचे आदेश देखील निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून, २०१२ नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झालेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेश प्रक्रिया न राबविता त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविणे शासनास अभिप्रेत आहे. परंतु द ग्रेट मौलाना अबुल कलाम आझाद अल्पसंख्यांक शैक्षणिक ट्रस्ट, सोलापूर या संस्थेला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०१२ नंतर मान्यता दिल्याने संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ६६००/२०१२ दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक १७/७/२०१२ रोजी संस्थेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यास अनुसरुन सदरहू संस्थेला त्यांचे अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : द ग्रेट मौलाना अबुल कलाम आझाद अल्पसंख्यांक शैक्षणिक ट्रस्ट, ६०३/४ न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालीलप्रमाणे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम त्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| | **अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रम** | |
| १ | सिव्हिल इंजिनिअरींग | ६० |
| २ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| ३ | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| ५ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| | **एकुण** | ३०० |

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) संस्थेने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ६६००/२०१२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहिल.

३) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१मे,

१९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

४) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बार्बीची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

५) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

६) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बार्बीची पूर्तता करावी.

७) सदर पदवीका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

८) संस्थने अभ्यासक्रम चालविण्यास पुर्ण वेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रीक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडुन शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

९) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

१०) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

११) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

१२) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निदेश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अॅक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१३) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अंबादे
२०/७/२०१२

(ज.म.अंबादे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

**१. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.**

**३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.**

**४. संबंधित संस्था (संचालकांमार्फत).**

**प्रत माहितीसाठी :-**

**१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.**

**२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.**

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एआयसीटीई/पदविका/मान्यता/२०१२/ ६६७
दिनांक : 27 JUL 2012

प्रति,
प्राचार्य,
दि ग्रेट मौलाना अबूल कलाम आझाद अल्पसंख्यांक एज्युकेशनल ट्रस्ट,
६०३/४, न्यु पच्छा पेठ, अशोक चौक,
सोलापूर-४१३००६.

**[6810]**

विषय : **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेस शासनाची मान्यता देण्याबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक : मान्यता २०१२/(१५१/२०१२)/तांशि-५, दिनांक २० जुलै, २०१२.
२) मा. उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ६६००/२०१२ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश.
३) या संचालनालनयाचे पत्र क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/नवीन संस्था/२०१२/६८१०, दि. २०.७.२०१२

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शासनाने संदर्भाधीन क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालील पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहीत अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कोड | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | सिव्हील इंजिनिअरींग | CE | ६० |
| २. | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | CO | ६० |
| ३. | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | EE | ६० |
| ४. | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | EJ | ६० |
| ५. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ME | ६० |

शासनाने दिलेल्या परवानगीस अनुसरुन वरील पदविका संस्थेसाठी वरील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व दि ग्रेट मौलाना अबूल कलाम आझाद अल्पसंख्यांक एज्युकेशनल ट्रस्ट यांच्या संयुक्त खात्यात, देना बँक, शाखा चाटी गल्ली, सोलापूर, येथे रुपये ९.०० लाख पावती क्रमांक- ११३३०९१, दिनांक २५.७.२०१२, अन्वये १० वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. वरील अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी रुपये ७.५० लाख इतक्या रकमेची १० वर्षासाठी नियतठेव भरण्यात यावी. सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेले अभ्यासक्रम सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्याकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. संस्थेतील कर्मचारी व शिक्षकांचे मासिक वेतन बँकेमार्फतच करावे.

६. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक किंवा या संचालनालयाने प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार संचालनालयास राहील.

९. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१३. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

**( डॉ. सुभाष महाजन )**
प्र. संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादरः-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे.
५. कार्यासन क्रमांक २-अ मुख्य कार्यालय, मुंबई.
६. कार्यासन क्रमांक ३, श्री एस. डी. उपरवट, प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यालय, मुंबई.
७. निवड नस्ती.